# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः29.09.2025** **वारःसोमवार**

---

1. आगामी सण-उत्सवांच्या काळात स्वदेशी उत्पादनांचीच खरेदी करण्याचं, मन की बातमधून पंतप्रधानांचं नागरिकांना आवाहन
2. आयर्लंडमध्ये भारतीय दूतावासाद्वारे भारत दौडचं आयोजन
3. सार्वजनिक इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग केंद्र सुरू करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वं लागू
4. आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत भारत नवव्यांदा अजिंक्य आणि
5. महाराष्ट्रात धरणांमधून विसर्गामुळं नद्यांना पूर

**मन की बात**

आगामी सण-उत्सवांच्या काळात स्वदेशी उत्पादनांचीच खरेदी करा, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल देशवासियांना केलं. आकाशवाणीवरील 'मन की बात' या कार्यक्रमाच्या 126 व्या भागात त्यांनी श्रोत्यांशी संवाद साधला. येत्या 2 ऑक्टोबरला महात्मा गांधी यांची जयंती साजरी करताना खादीची उत्पादनं खरेदी करा; जीएसटी सुधारणांमुळे बचत उत्सव साजरा होत असताना, व्होकल फॉर लोकल, हा खरेदीचा मंत्र बनला पाहिजे, असं ते म्हणाले...

**आने वाले दिनों में एक के बाद एक त्योहार और खुशियां आने वाली हैं। हर पर्व पर हम खरीदारी भी खूब करते हैं। और इस बार तो जीएसटी बचत उत्सव भी चल रहा है। अगर हम ठान लें कि इस बार त्योहार सिर्फ स्वदेशी चीजों से ही मनाएंगे, तो देखिएगा, हमारे उत्सव की रौनक कई गुना बढ़ जाएगी। वोकल फॉर लोकल को खरीदारी का मंत्र बना दीजिए। ठान लीजिए, हमेशा के लिए, जो देश में तैयार हुआ है, वही खरीदेंगे।**

यंदाच्या विजया दशमीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा 100 वा वर्धापन दिन आहे; असं सांगून संघाच्या कार्याचा त्यांनी गौरव केला…

**अगले कुछ ही दिनों में हम विजयादशमी  मनाने वाले हैं। इस बार विजयादशमी एक और वजह से बहुत विशेष है। इसी दिन राष्ट्रीय स्वयंसेवक संघ की स्थापना के 100 वर्ष हो रहे हैं। देश में कहीं भी प्राकृतिक आपदा आए, RSS के स्वयंसेवक सबसे पहले वहाँ पहुँच जाते हैं। लाखों लाख स्वयंसेवकों के जीवन के हर कर्म, हर प्रयास में राष्ट्र प्रथम nation first की यह भावना हमेशा सर्वोपरि रहती है।**

हुतात्मा भगतसिंग आणि ज्येष्ठ गायिका लता मंगेशकर यांच्या जन्मदिनानिमित्त पंतप्रधानांनी त्यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना अभिवादन केलं. नवरात्रोत्सवानिमित्त महिला शक्तीचं महत्त्व अधोरेखित करत; नौदलाच्या दीर्घ सागरी सफरीत सहभागी झालेल्या लेफ्टनंट कमांडर दिलना आणि लेफ्टनंट कमांडर रुपा यांच्याशी पंतप्रधानांनी संवाद साधला. लोकप्रिय आसामी गायक जुबीन गर्ग आणि प्रसिद्ध कन्नड साहित्यिक एस.एल. भैरप्पा यांना पंतप्रधानांनी आदरांजली वाहिली.

## सेवापर्व-रेल्वे सेवा

सेवा आणि सुशासन, या मंत्रानुसार काम करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार देशात परिवर्तन आणि प्रगती घडवून आणण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. 'सेवा पर्व' या विशेष मालिकेत आज ऐकुया गेल्या दशकात रेल्वेसेवेत झालेल्या सुधारणांची माहिती...

**गेल्या दशकात भारतीय रेल्वेमध्ये अनेक पातळ्यांवर क्रांतिकारी सुधारणा झाल्या आहेत; त्यामुळे देशाची जीवनरेखा अशी ओळख असलेली रेल्वे आता देशाच्या विकासाचं केंद्र झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या काळात काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत रेल्वे जाळं तयार करण्यात आलं आहे. याबाबत बोलताना पंतप्रधान म्हणतात...**

**वंदे भारत, अमृत भारत, नमो भारत रॅपिड रेल अशा विविध रेल्वे, प्रवाशांना अधिक आरामदायी, सुरक्षित आणि उत्कृष्ट दर्जाचा प्रवास अनुभव देत आहेत. अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत 1300 हून अधिक स्थानकांचा पुनर्विकास केला जात आहे.  रेल्वेच्या सुरक्षित संचलनासाठी भारतीय रेल्वेने कवच ही अत्याधुनिक स्वयंचलित प्रणाली सुरू केली आहे. तसंच भविष्यवेधी, किफायतशीर, सुरक्षित आणि विश्वासार्ह सेवा देण्यासाठी राष्ट्रीय रेल्वे योजनाही तयार करण्यात आली आहे.**

## आईसलँड

आइसलँडमधील भारतीय दूतावासानं आयोजित केलेल्या विकसित भारत दौडमध्ये भारतीय नागरिकांनी भाग घेतला. आइसलँडमधील भारताचे राजदूत आर. रवींद्र यांनी भारतीय समुदायाच्या सदस्यांना संबोधित केलं आणि त्यांना विकसित भारताची प्रतिज्ञा दिली. स्वावलंबी आणि विकसित भारत निर्माण करण्यासाठी परदेशातील भारतियांना योगदानार्थ प्रेरित करण्यासाठी ही दौड आयोजित करण्यात आली असल्याचं रेकजाविकमधील भारतीय दूतावासानं समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

## बलोच

बलुचिस्तानमध्ये स्थानिक नागरिक बेपत्ता होण्याचं सत्र सुरुच आहे. पाकिस्तानी सुरक्षा दलांनी आणखी तीन बलोच व्यक्तींना काल जबरदस्तीनं ताब्यात घेतलं. बलोच नॅशनल मुव्हमेंटचा मानवाधिकार विभागानं ही माहिती दिली आहे.

## व्हिएतनाम-वादळ

व्हिएतनाममध्ये बुआलोई वादळामुळं त्याचा धोका असलेल्या भागातील विमानतळ बंद करण्यात आली आहेत. हजारो नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे. या वादळामुळं फिलीपिन्समध्ये किमान 10 जणांचा मृत्यू झाला आणि अनेक भागात पूराचा तडाखा बसला आहे. हे वादळ एकाच वेळी अनेक नैसर्गिक आपत्तींना कारणीभूत ठरू शकतं असा इशारा देण्यात आला आहे.

## ई-ड्राइव्ह

केंद्र सरकारनं पंतप्रधान ई-ड्राइव्ह योजनेअंतर्गत देशभरातील एकंदर 72 हजार 300 सार्वजनिक इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग केंद्र सुरू करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वं लागू केली आहेत. अवजड उद्योग मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनानुसार, सरकारी जागा असलेला परिसर, महामार्ग, सार्वजनिक वाहतूक केंद्रं आणि व्यवसायिक संकुलांमध्ये चार्जिंग पायाभूत सुविधांच्या स्थापनेला गती देण्यासाठी अनुदानावर आधारित रचना तयार करण्यात आली आहे.   या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, सरकारी कार्यालयं, निवासी वसाहती, रुग्णालयं आणि शैक्षणिक संस्था पायाभूत सुविधा वाढीसाठी आणि ईव्ही चार्जिंग उपकरणांवर 100 टक्के अनुदानासाठी पात्र असतील. रहदारी जास्त असलेल्या सार्वजनिक ठिकाणी, पायाभूत सुविधांच्या उभारणी खर्चाच्या 80 टक्के आणि चार्जिंग उपकरणांच्या खर्चाच्या 70 टक्के अनुदान दिलं जाईल.

**नक्षलवाद-पुल**

ईशान्य क्षेत्र आणि जम्मू-काश्मीर विकास आणि शांततेच्या मार्गावर प्रगती करत असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत 'नक्षलमुक्त भारत: लाल दहशतवादाचा अंत' या राष्ट्रीय शिखर परिषदेच्या समारोप सत्रात ते काल बोलत होते. सरकारनं संवाद, सुरक्षितता आणि समन्वय या तीन प्रमुख तत्वांवर काम केलं आहे. परिणामी 2004 ते 2014 या दशकाच्या तुलनेत 2014 ते 2024 दरम्यान ईशान्येकडील सैन्य कर्मचाऱ्यांच्या मृत्यूंमध्ये 70 टक्के घट झाली आहे. याच काळात या प्रदेशात हिंसाचारामुळं होणाऱ्या नागरिकांच्या मृत्यूंमध्येही 85 टक्क्यांनी घट झाली आहे असं शहा यांनी सांगितलं.

**निवडणूक आयोग-केंद्रीय निरीक्षक**

भारतीय निवडणूक आयोगानं बिहारमधील आगामी विधानसभा निवडणुका आणि विविध राज्यांमधील आठ विधानसभा मतदारसंघांमधील पोटनिवडणुकांसाठी केंद्रीय निरीक्षक तैनात करण्याची घोषणा केली आहे. या निरीक्षकांमध्ये सामान्य नागरिक, पोलिस आणि खर्च निरीक्षकांचा समावेश असेल. मुक्त, निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणुका सुनिश्चित करण्यासाठी 320 जिल्हाधिकारी आणि 60 पोलीस दलातील अधिकाऱ्यांसह एकंदर 470 अधिकारी केंद्रीय निरीक्षक म्हणून तैनात केले जातील.

**क्रिकेट**

आशिया क्रिकेट करंडक स्पर्धेत काल अंतिम सामन्यात भारतानं पाकिस्तानचा 5 गडी राखून पराभव करत आशिया चषकाला नवव्यांदा गवसणी घातली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय संघाचं अभिनंदन केलं आहे. नाणेफेक जिंकल्यानंतर भारतीय गोलंदाजांनी केलेल्या माऱ्यामुळे पाकिस्तानचा डाव 146 धावांमध्ये आटोपला. भारताच्या तिलक वर्मा, संजू सॅमसन आणि शिवम दुबे यांच्यातील अर्धशतकी भागीदारीने भारताला दोन चेंडू शिल्लक असताना विजय मिळाला. कुलदीप यादवनं चार गडी बाद करून संपूर्ण मालिकेत सर्वाधिक सतरा बळी घेतले. तिलक वर्मा सामनावीर तर अभिषेक शर्मा मालिकावीर ठरला. भारतीय कर्णधार सुर्यकुमार यादवनं सामन्यात मिळालेली रक्कम भारतीय सेनेला देण्याची घोषणा केली.

**पाऊस-महासंवाद**

महाराष्ट्रात कालही मराठवाड्यासह बहुतांश भागात पावसाचा जोर होता. ठिकठिकाणची धरणं भरल्यानं किंवा त्यांच्या पाणी पातळीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यानं पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला. त्यामुळे नद्यांना पूर आले आहेत. या पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मराठवाड्यातल्या आठ जिल्ह्यांसह सोलापूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून मदतकार्याचा आढावा घेतला. धरणांमधून विसर्ग वाढवण्याआधीच नदीकाठच्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्याकडे लक्ष द्यावं, आणि सर्व अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष त्या त्या जागी राहून काम करावं, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही ठाण्यासह कोकण विभागातील जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीचा काल आढावा घेतला आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी सज्ज राहण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले.

**हवामान**

महाराष्ट्रातील कोकणात मुसळधार तर, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.